कान्होजी आंग्रे यांच्या
सागरी व्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास

A Critical Study of Marine Navy Management of
Kanhoji Angre (Angria Back)

पीएच. डी. (विद्यावाचस्पती) पदवीकरिता
सादर केलेला संशोधन आराखडा

SHRI JAGDISHPRASAD JHABARMAL TIBREWALA
UNIVERSITY, RAJSTHAN

– संशोधक –

श्री. गौतम ज्ञानदेव धुमाळ

एम. ए. (इति.) बी. एड्.

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय

औंध, ता. खटाव जि. सातारा.

– मार्गदर्शक –

प्रा. डॉ. अमर पांडे

इतिहास विभाग

श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय सांगली.

SHRI JAGDISHPRASAD JHABARMAL TIBREWALA UNIVERSITY, RAJSTHAN

एप्रिल २०११

प्रस्तावना –

इतिहासामध्ये मराठ्यांच्या आरमाराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कान्होजी आंग्रे या अद्वितीय सागरी योध्द्याने मराठी आरमार प्रमुख म्हणून त्याचबरोबर सागरी प्रशासन, व्यवस्थापन, युध्दकौशल्य व परकिय सत्तांशी दिलेला अलौकिक लढा, संघर्ष या दृष्टीने मराठी आरमारांनी केलेली कामगिरी भूषणावह दिसून येते. या मराठी आरमाराचे जनक छत्रपती शिवराय होते. शिवरायांनी आरमाराचे महत्त्व जाणले. आपले खरे शत्रू परकिय इंग्रज सिद्दी, पोर्तुगीज हेच आहेत. हे लक्षात येताच छत्रपती शिवाजीराजांनी कोकण किनारपट्टीचे महत्त्व जाणले. आणि आपल्या प्रशासनातील मराठा लष्करी व्यवस्थेचे खास वैशिष्ट्य म्हणजे आरमार होय. म्हणूनच छत्रपती शिवरायांना सागरी आरमाराची उभारणी व बांधणी करणारा महान नेता निर्माता, जनक या दृष्टीने शिवरायांचे सागरी धोरण दूरदृष्टीचे दिसून येते. त्या काळामध्ये सागरावर युरोपियन व्यापाऱ्यांचे आरमारी वर्चस्व असे. शिवरायांनी सन १६५८ पासून आरमार बांधणीचा उद्योग कोकण किनारपट्टीवरील बंदरात सुरू केला. शिवरायांच्या या आरमाराचा प्रचंड विस्तार करणारा महान सागरी योध्दा म्हणजे कान्होजी आंग्रे होय. अशा या कान्होजी आंग्रेने परकिय सत्ता, इंग्रज, सिद्दी, पोर्तुगीज यांचा बंदोबस्त करून मराठ्यांची कोकणकिनारपट्टीवर दहशत निर्माण केली. परकियांच्या बंदोबस्त निर्माण करण्यासाठी त्याने आरमारामध्ये वेगवेगळ्या सुधारणा, कौशल्ये, शिस्त, कार्यक्षमता आणि अव्वल दर्जाचे प्रशासन व्यवस्थापन केल्यामुळेच कोकण किनारपट्टीवर मराठ्यांचे वर्चस्व निर्माण झाले. तेव्हा कान्होजी आंग्रे याने आरमाराच्या सहाय्याने परकिया सत्तांशी दिलेला लढा यासाठी त्याने राबविलेली धोरणे, त्याचे व्ययस्थापन व युध्दकौशल्य महत्त्वाचे आहे.

सरखेल कान्होजी आंग्रे, जन्म १६६९, हर्णे, जि. रत्नागिरी, मृत्यू– ४ जुलै १७२९ कुलाबा किल्ला, अलिबाग. त्यांचा कर्तृत्व कार्यकाळ १६९८ ते १७२९ हा होय. सरखेल म्हणजे आरमारप्रमुख. १८ व्या शतकातील मराठा आरमार प्रमुख

म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. आपले सारे अखंड आयुष्य त्यांनी इंग्रज, पोर्तूगीज, डच, आरमाराबरोबर लढाया करण्यात घालविले. त्यांच्या काळात भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर वर्चस्व गाजविण्यासाठी आणि मोक्याच्या ठिकाणची बंदरे, किल्ले, काबीज करणेसाठी परकीय सत्तांमध्ये मोठी चढाओढ लागली होती. अशा परिस्थितीमध्ये मराठा राज्य वाचविणे, टिकवणे यादृष्टीने कान्होजी आंग्रे यांनी केलेले सागरी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वपूर्ण मानले गेले. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील बंदरे ताब्यात ठेवून आपला व्यापारी माल युरोपमध्ये पाठविण्यासाठी परकीय सत्तांना भारतीय बदरांची गरज वाटत होती. सागरी व्यापाराचे रक्षण करणे आणि मोक्याच्या ठिकाणी सागरी किल्ले काबीज करणे जणू आपली मक्तेदारीच प्रस्थापित करणेची गरज परकियांना होती. अशा परिस्थितीत कान्होजी आंग्रेसारख्या महान योध्दयाने आपले आरमार मजबूत करून संपूर्ण सागर किनारपट्टीवर स्वतःची दहशत निर्माण केली. परकीय सत्तांनी त्याच्यावर समुद्री चाचे असा आरोप केला पण इंग्रज, पोर्तूगीज आरमारांना त्याने नाकीनऊ करून सोडले. मरेपर्यंत मराठा आरमार अजिंक्य ठेवले. हरणे या गावी एका संकपाळ कुटुंबात जन्माला आलेला त्यांचे मूळ नाव कडू होते. संकपाळ हे वीर राणा संक या संप्रदायाचे होते. वडिलांचे नाव तुकोजी, आईचे अंबाबाई आणि पुढे बराच काळ त्यांना मूलबाळ झाले नाही. तेव्हा अंगाऱ्याच्या आशिर्वादाने आम्हाला मूल झाले तर आम्ही त्याला तुझे नाव देऊ आणि आमचे आडनाव अंगारे ठेवू. त्यामुळे पुढील काळात कडूचे नाव संकपाळ आणि संकपाळनंतर आंग्रे म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांचे सारे बालपणे सुवर्णदुर्ग या सागरी किल्ल्यात गेले. हा किल्लाच पुढील काळात त्याने काबीज केला. त्यांचे वडील शिवरायांच्या पदरी सरदार होते. त्यामुळेच कान्होजीला लहानपणापासून समुद्रसफरी आणि साहसी मोहिमांची आवड निर्माण झाली. साताराच्या भोसल्यांनी १६९८ मध्ये त्यांना दर्यासारंग पदवी देवून मुंबईपासून वेंगुलापर्यंतची जबाबदारी सोपविली. सिद्दी जौहारच्या ताब्यातील जंजिरा मात्र मुघलांच्या ताब्यात राहिले. कान्होजीने सुरुवातीस इंग्रज जहाजावर हल्ले चढविले. कोल्हापूरचे छत्रपती

शाहू महाराज १७०७ मध्ये त्यांचे सेनापती पेशवे बाळाजी विश्वनाभ भट यांना कान्होजी बरोबर करार करण्यास पाठविले. या काळात ते मराठा आरमारप्रमुख बनले. अशा प्रकारे कान्होजी आंग्रेसारख्या महान योध्द्याने अनेक नाविक तळ काबीज केले. युध्द मोहिमा सर केल्या. प्रमुख लढाया प्रामुख्याने खालीलप्रमाणे दिसतात.

प्रमुख लढाया -

१७०२ - कोचीनमध्ये सहा इंग्रजांसह काही जहाजांवर ताबा.

१७०६ - जंजिऱ्याच्या सिद्दीवर हल्ला आणि विजय

१७१० - ब्रिटिश लढाऊ जहाज गोडोल्फिनशी दोन दिवस झुंज दिल्यानंतर केनेरी बेटांवर (आताचे खांदेरी) कब्जा.

१७१२ - मुंबई ब्रिटिश गव्हर्नर विल्यम ऐस्लाबी यांचे खाजगी जहाज पकडले. ३०००० रुपयांच्या खंडणीनंतर सुटका.

१७१३ - ब्रिटिशांकडून १० किल्ले हस्तगत

१७१७ - ब्रिटिशांनी केनेरी बेटांवर केलेला हल्ला असफल. ६०००० रुपयांची खंडणी वसूल केली.

१७१८ - मुंबई बदराची नाकेबंदी. येणाऱ्या जाणाऱ्या जहाजांकडून कर वसुली.

१७२० - ब्रिटिशांचा घेरिया (विजयदुर्ग) किल्ल्यावर हल्ला असफल

१७२१ - अलिबागवर ब्रिटिश आणि पोर्तुगीज आरमाराचा हल्ला असफल

१७२३ - ईगल आणि हंटर या दोन ब्रिटि जहाजांवर हल्ला.

असा हा कान्होजी आंग्रे हे अद्वितीय सागरे योध्दे म्हणून त्यांचे नाव, स्थान, मराठा इतिहासात अजरामर आहेत. तेव्हा त्यांचे विचार अवलोकन करणे, संशोधक

इतिहासाचे वाचक, अभ्यासक, पंडित व विचारवंत यांच्यासमोर मांडणे या दृष्टीने संशोधकाने ही समस्या महत्त्वाची मानली आणि कान्होजी आंग्रे यांच्या सागरी व्यवस्थापनाच्या विविध पैलूंचा शोध या संशोधनात घेण्यात येणार आहे.

संशोधन समस्येचे शीर्षक –

''कान्होजी आंग्रे यांच्या सागरी व्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास''
(अँग्रीया बॅक)

संशोधनाची गृहितके –

१) कान्होजी आंग्रे यांच्या सागरी सत्तेला स्थैर्य मिळाल्यामुळे त्यांना मराठा आरमाराची घडी व्यवस्थित बसविता आली.

२) कान्होजी आंग्रे यांनी सागरी लष्करी धोरणांना प्राधान्य दिले.

३) कान्होजी आंग्रे यांनी मराठा आरमाराचा विस्तार केल्यामुळे त्यांचे सागरी वर्चस्व सिध्द झाले.

४) कान्होजी आंग्रे यांच्याकडे मराठी आरमार प्रमुखाची सर्वच सूत्रे केंद्रीत झाल्यामुळे त्यांना सागरी व लष्करी निर्णय घेणे शक्य झाले.

५) कान्होजी आंग्रे यांचे सागरी प्रशासन कौशल्य महत्त्वाचे ठरतात.

६) कान्होजी आंग्रे यांचे परकिय शत्रू यांच्याबाबतचे निर्णय महत्त्वाचे मानले.

७) कान्होजी आंग्रे यांचे सागरी व्यवस्थापन व युध्द कौशल्य महत्त्वाची आहेत

८) कान्होजी आंग्रे यांनी मराठी आरमाराचा विस्तार केला व आरमाराच्या माध्यमातून राज्याला आर्थिकदृष्ट्या बळकट केले.

९) कान्होजी आंग्रे यांचे परकियांच्याबरोबर संघर्ष वर्चस्व महत्त्वाचे आहेत.

१०) कान्होजी आंग्रे यांना हवामान, सागरी किन्नारपट्टीवरील भौगोलिक परिस्थितीची जाण होती.

संशोधनाची उद्दिष्ट्ये–

१) कान्होजी आंग्रे यांच्या सागरी व लष्करी धोरणाची चिकित्सक पध्दतीने मांडणी करणे

२) मराठा आरमार प्रमुख या दृष्टीने कान्होजी आंग्रे यांनी सागरी सत्ता कशी निर्माण केली, याचा शोध घेणे.

३) कान्होजी आंग्रे यांचे मराठा आरमारप्रमुख म्हणून कारकीर्द अभ्यासणे.

४) कान्होजी आंग्रे आणि इतर परकीय सत्ता यांच्याशी झालेल्या संघर्षाचा अभ्यास करणे.

५) कान्होजी आंग्रे यांचे सागरी युध्दतंत्र व गणिनी कावा नितीविषयक धोरण अभ्यासणे.

६) कान्होजी आंग्रे यांचे सागरी लष्करी धोरणांचा आढावा घेणे.

७) कान्होजी आंग्रे यांचे कोकण किनारपट्टीवरील धोरणांचा आढावा घेणे.

८) कान्होजी आंग्रे यांना कोकण किनारपट्टीवरील अवगत असलेल्या भौगोलिक परिस्थितीचा शोध घेणे.

९) कान्होजी आंग्रे यांचे कोकण किनारपट्टीवरील इतर सरदारांच्या बाबतीतील धोरण अभ्यासणे.

१०) कान्होजी आंग्रे यांचे अंग्रिया बँक संदर्भातील सागरी युध्द नितीचा वापर करणे.

संशोधनाचे महत्त्व –

मराठ्यांच्या इतिहासामध्ये जमिनीवरील लढाया, किल्ल्यांचे प्रशासन, लष्करी मुलकी व्यवस्था, या दृष्टीने मोठे विजय तसेच पराभवही अनेक इतिहासकार, वाचक, इतिहासाचे अभ्यासक यांनी अभ्यासले मात्र सागरी प्रशासन व्यवस्थापन आणि आरमार काय असते, यादृष्टीने व्यापक विचार झालेला दिसत नाही. परंतु सागरी व्यवस्थापन, सागरी मोहिमा, नियोजन या दृष्टीने विचार झालेला दिसत नाही. सागरी व्यवस्थापनामध्ये शिस्त,

नियंत्रण, समन्वय, सुसंवाद, संघटनकौशल्य आणि कार्यक्षमता यांना कान्होजी आंग्रे यांनी प्राधान्य दिले. तेव्हा मराठ्यांचे आरमार व आरमारांची ज्यांनी प्रामाणिकपणे वाढ केली, त्याची सत्यता इतिहास वाचकांसमोर आणणे या दृष्टीकोनातून या संशोधनामध्ये कान्होजी आंग्रे यांच्या सागरी व्यवस्थापनातील विविध घटकांचा विचार या संशोधनात केला जाणार आहे.

तुकोजी संकपाळ हे कान्होजीचे वडील स्वकर्तृत्वाने सुवर्णदुर्ग किल्ल्याचे किल्लेदार बनले. वडिलांच्याकडूनच कान्होजीला आरमारी शिक्षणाचे पाठ मिळाले. छत्रपती संभाजी राजांच्या कारकिर्दीत कान्होजीला चांगली संधी मिळाली. १६८५ ते १६८८ या काळात कान्होजी आंग्रे स्वतःच्या बुध्दीने कर्तबगारीने चांगलीच चमक दाखविली. या दरम्यानच्या काळात मोठा पराक्रम करून नावलौकिक संपादन केला. छत्रपती राजारामने त्यांना सरखेल हा मानाचा किताब देऊन ते म्हणाले की, ‘शहाणे, शूर, मर्द जाणोन राजारामाने आंगरे यास सुवर्णदुर्गी ठेविले. त्यांना तेथे राहून बहुत खबरदारीने सर्व जंजिरे व प्रांत राखिला. काही किल्ले व ठाणी पातशाहीत गेली. ती जमावर्दीने घेतली. झाडीतून हिंडणे, स्वाऱ्या करणे, खराब केलेले मोडलेले जागे नीट करून स्वारी शिकारी करणे असे बहुत कर्ते त्याजवरून राजाराम महाराज चंदीहून आल्यावर, त्यांनी सर्फराजी करून कान्होजीस ‘सरखेल’ हा किताब दिला.’ त्यानंतर कान्होजी आपले मुख्य ठिकाण कुलाबा या ठिकाणी केले. या काळात कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग ही चार मराठी आरमाराची ठाणी होती. मलबारपासून ते गुजरातपर्यंत कान्होजीने आपली दहशत बसविली. इंग्रजांना तर कान्होजी आंग्रेची धास्तीच वाटत होती. आंग्र्यांचा मुंबईवर केव्हा हल्ला होईल यासंबधी दिनांक २७ मार्च १७०१ मधील उल्लेख महत्त्वपूर्ण ठरतो.

The Siddi still continues this siege without doing any great matter of Calaby we shall be watch full of Shivgees

and other's who may presume to attempt anything a island to give a warm welcome (20th March 1701)

कान्होजी आंग्रेनी इंग्रजाशी उभा दावा केला. इंग्रज धास्तावले. १६९९ मध्ये इंग्रज कान्होजी आंग्रे यांचा संघर्ष या संदर्भात इंग्रजांच्या पत्रव्यवहारात उल्लेख मिळतो. १६९८ मध्ये इंग्रजांची दंड राजापूरजवळील जहाजे लुटली. त्याचा उल्लेख इंग्रज दप्तरात आढळतो.

On the 16th Feb. 1695-96 the Emerald on her way from calicul to Bombay met Sevagee's people ward and Danda Rajpoor.

A letter from Bombay company dated 22nd May 1698... 22 Sevajee's boats that came in to river Landed 300 men withing half a mile of factory.

10th April-

Small vessals for Convoys and encourge the trade of the island for Sevagee's and singnamians.

16 Jan. 1698-99

The Sevajees of Padmadurg castle near Dandu Raipuri (sic) saiged upon two salt vessels beloninging to this Island took the Banyans and others inpriosned and most miserable beat them saying that they cared not for the English or any else...."

इंग्रजांच्या या व्यापारी धोरणाला सागरी वर्चस्वाला लगाम घालण्याचा आटोकाट प्रयत्न करणारा महान दर्यावर्धी निर्माण झाला तो म्हणजे मराठी आरमार प्रमुख (सरखेल) कान्होजी आंग्रे होय. अशा या कान्होजी आंग्रेने इंग्रजांच्या शोधक बुध्दीला आव्हान दिले. प्रचंड आरमार निर्माण करणाऱ्या इंग्रजांना आंग्रे यांच्या छोट्या छोट्या नौकांनी नाकेनऊ करून सोडले. आंग्रे हे आपले कर्दनकाळ आहेत, ही जाणीव पोर्तुगीजांना झाली. म्हणूनच इंग्रज पोर्तुगीजांनी आंग्रे यांच्या संयुक्त मोहिम आखली. परंतु मराठा आरमारप्रमुख

कान्होजी आंग्रे यांच्या सागरी व्यवस्थापनापुढे इंग्रज पोर्तुगीजांचा धुव्वा उडाला. कान्होजी आंग्रेचे सागरी व्यवस्थापन अजिंक्य ठरले. एक लूटमार करणारा 'चाचा' (Pirate) अशी कान्होजी आंग्रे यांची निंदा नालस्ती करणारे इंग्रज यांना कान्होजी आंग्रे याच्या सागरी व्यवस्थापनाने जबरदस्त थप्पड दिली. इंग्रजांना कळून चुकले, जगात आपणच दर्यावर्दी, बुध्दीमान आहोत, पण ही त्यांची भावना कान्होजी आंग्रे यांच्या सागरी व्यवस्थापनाने धुळीला मिळाली.

२६/११, २००८ चा समुद्रमार्गे अतिरेक्यांनी मुंबईवर केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर या संशोधनाचे महत्त्व आहे. म्हणून त्या काळाचे सागरी वर्चस्व आताही तितकेच समर्थपणे ठेवणे गरजेचे असून कान्होजी आंग्रे यांचे सागरी आरमारावर असलेले वर्चस्व याच्या अभ्यासाचे महत्त्व निर्णायक ठरते.

समस्येचे विश्लेषण स्पष्टीकरण–

कान्होजी आंग्र्यांचे प्रशासन व आरमार युध्दनीती अवर्णनीय होती असे म्हणावे लागेल. कारण सरखेल कान्होजी आंग्रे यांनी १६९३ ते १७२९ म्हणजे जवळजवळ ३६ वर्षे यशस्वीपणे राज्यकारभार केल्याचा दाखला संदर्भातून मिळतो आहे.

राजारामांच्या कारकिर्दीत ते आरमारप्रमुख असले तरी त्यांना सरखेलपदाची मानाची सनद त्यांना प्राप्त झालेली आहे. राजारामकालीन मुद्रा पुढे काही वर्षे पत्रांवर आढळून येते. इ. स. १७२० मधील पत्रावरही मुद्रा आढळते. म्हणजे राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर २० वर्षांनी या मुद्रेखाली पत्रे होत होती असे दिसून येते.

प्रशासकीय बाबीमध्ये जमाबंदी, वतनदार, उत्पन्नाच्या बाबी, मोहतर्फा, जकातीचे उत्पन्न आदीबाबत पत्रोल्लेख आढळून येतो. छ. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत आण्णाजी दत्तो यांनी जमिनीची मोजणी करून उत्पन्नावर ऐनजिनसी सारा बसविला. आंग्रे काळात ही सारीपध्दती चालू राहिली.

वतनदार, देशमुख, देशपांडे, देसाई, चौधरी, अधिकारी, सरपाटील, सरखोत, कुलकर्णी, डांगे, पाटील, कमावीसदार हे वतनदार होते. मिरासदार व वतनदार यांना वंशपरंपरा जमीन असे. तर उत्पन्नाच्या बाबीमध्ये घरपट्टी, म्हैसपट्टी, कोळीपट्टी असे कर असत. दुकानपट्टी ही उदीमांना गुजरांना द्यावा लागे. पाणीपट्टी आकारली जाई. ताडमाडावर भंडारी लोकांकडून कर घेतला जाईल. याशिवाय सुतार, लोहार इ. वर कर आकारला जाईल. वस्तूवर कर भरावा लागत असे. शिवकालाप्रमाणेच निमतावा काढून ऐकजिनसी जमाबंदी ढेप, हुंडाबंदी, मुडाबंदी, कासबंदी, टाक व टोकबंदी या प्रकारातून केली जात असे.

याशिवाय आंग्र्यांचे नाविक प्रशासन तसेच रचना वगैरे वाखाणण्यासारखी होती. आंग्र्यांची जहाजे अशा विशिष्ट हेतूने बांधली जात की शत्रुंचे हलक्यातल्या हलक्या वजनाचे जहाज असले तरी त्यांच्या पाठलाग या जहाजांना करता यावा म्हणून आंग्र्यांची जहाजे उथळ व चिंचोळी बांधण्यात आलेली आढळतात. जहाजांवर बंदुका सफाईने बसविल्या जात असत. त्याचप्रमाणे युध्दनीतीची हत्यार, निरीक्षण करण्याचे ठिकाण आदि सर्व बाबतीतले युध्दकौशल्य या जहाज बांधणीतून दिसून येत असे की ज्यामुळे कोणत्याही शत्रूपक्षाला पिटाळून लावले जायचे.

त्याचप्रकारे गलबतांचीही रचनाही असायची. जहाण बांधण्याच्या मुहूर्तांचे लाकडास मांदी म्हणत. मांदीच्या पुढच्या व मागच्या लकडाला ‘पठाण’ म्हणत. नाव किंवा होडी ही छोटी असे. मचव्याचा उपयोग उतारू व मालवाहतुकीसाठी करीत. जेणेकरून ज्या प्रकारचे गलबत किंवा जहाज असे त्यात विशिष्ट पध्दत वापरली जायची.

कान्होजीने आपल्या राज्यात टांकसाळ सुरू केली होती. कोळ्यांची वसाहत करून त्यांना मोठ्या मोठ्या हुद्यावर कामे दिली. मोदी, गुजर असे प्रस्थ व्यापारी आणून राज्यातील व्यापारही त्यांनी वाढविला. उत्कृष्ट तोफा

ओतवून व पहिल्या प्रतीची आरमारे जहाजे आपल्या राज्यात कामगारांकडून बांधून घेतली, याचाही उल्लेखनीय बाब या संशोधनात करण्यात येणार आहे.

संशोधनाची कार्यपधदती –

संशोधनपध्दतीमध्ये संशोधन पध्दत आणि संशोधनाच्या तंत्रांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या संशोधनामध्ये अधिक वास्तव निष्कर्ष काढता यावेत, यासाठी ऐतिहासिक व वर्णनात्मक पध्दतींचा वापर करण्यात येणार आहे. एका विशिष्ट सामाजिक, आर्थिक, राजकीय, लष्करी, सागरी शक्तींच्या संघर्षातून निर्माण झालेल्या परिस्थितीच्या संदर्भामध्ये कान्होजी आंग्रे यांनी सागरी व्यवस्थापन आणि युध्दतंत्र या संदर्भातील धोरणे निर्धारित करण्यात येणार आहेत. कान्होजीच्या काळात त्यांनी विदेशी सत्तांना सागरी किनारपट्टीवर मोठे आव्हान निर्माण केले होते. इंग्रज आणि पोर्तुगीज या आरमाराचे तर त्यांने प्रचंड नुकसानच केले. भारतातील त्याच्या वाढत्या वर्चस्वावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न इंग्रजांनी सदैव केला. परकीय आक्रमणाला तोंड देऊन सागरी सीमेचे रक्षण करणे किती महत्त्वाचे आहे हे कान्होजी आंग्रे यांनी त्याकाळी ओळखले होते. आज भारतीयांना त्याचा विसर पडला आहे. यासंदर्भात २६–११ चा कसाबचा हल्ला प्रकाश टाकतो. कान्होजीच्या सागरी साम्राज्याच्या उत्कर्षाला त्याच्याकडे ब्रिटिशांचे अधिक संख्येचे आणि बलाढ्य आरमार काही करू शकले नाही. अशा प्रकारे या संशोधनामध्ये कान्होजी आंग्रे यांच्या व्यक्तिमत्त्वाबरोबर त्याच्यातील सागरी व्यवस्थापन व युध्दतंत्र या गोष्टींची चिकित्सक पध्दतीने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संशोधनाची साधने –

अ) प्राथमिक साधने :

१) या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्तात येईल.

२) ऐतिहासिक कागदपत्रांची प्रत्यक्ष पाहणी

३) आंग्रेकालीन पत्रव्यवहार, संपादक – आवळसकर शांताराम व्ही.

४) आज्ञापत्र मानसन्मान प्रकाशन २००४, संपादक डॉ. कुलकर्णी अ. रा.

५) सरखेल कान्होजी आंग्रे, डॉ. केतकर द. रा.,

६) मराठी राज्याचा उतराखंड–१, वासुदेवशास्त्री

७) साद सागराची, गोखले पु. गो.

८) मराठ्यांचे आरमार, मुंबई, पारसनीय द. ब.

९) पोर्तुगीज मराठा संबंध, पिसुर्लेकर पां. स.

१०) मराठ्यांच्या इतिहासाचे साधने, पोर्तुगीज दप्तर, देसाई स. शं.

११) हिंदुस्थानचा सागर विक्रम, डॉ. टेंभे भास्कर महादेव

१२) कुलाबकर आंग्रे सरखेल : आंग्रे घराण्याचा इतिहास, ढब्बू, दा. गो.

१३) गोखले पु. गो., साद सागराची, म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९८५

ब) दुय्यम साधने –

१) मराठाकालीन सामाजिक व राजकीय आणि सागरी पत्रव्यवहार

२) कोकणच्या इतिहासाची साधने (भा.इ.मं. त्रैमासिक १९४८)

३) ताराबाईकालीन कागदपत्रे, संपादक– डॉ. पवार आप्पासाहेब

४) शिवचरित्र साहित्य खंड ९, चौल अधिकारी दप्तर, संपादक– आवळसकर शांताराम व्ही.

५) मुंबई गॅझेट, पान क्र. १४, १६५

६) शाहूंची रोजनिशी

७) ऐतिहासिक बखरी, भाग १, संपादक– सोहनी अविनाश

८) कान्होजी आंग्रे १९५०, माळगावकर मनोहर, अनुवाद– पु. ल. देशपांडे

९) ऐतिहासिक संकीर्ण निबंध, त्रैमासिक, वर्ष ७–८ वे, इतिवृत्त शके – भारत इतिहास संशोधन मंडळ.

१०) सांगली, कोल्हापूर, पुणे येथील विविध महाविद्यालयातील ग्रंथालयांचा उपयोग करण्यात येईल.

संशोधन कालावधी–

अ.क्र.	कामाचा कालावधी दिनांक/महिना/वर्ष	कामाचे नियोजन
१)	१० जानेवारी २०११ ते ३० जून २०११	प्रगती अहवाल तयार करणे.
२)	१ जुलै २०११ ते ३१ डिसेंबर २०११	संदर्भ ग्रंथ वाचन, लेखन, निरीक्षण
३)	१ जानेवारी २०१२ ते जून २०१२	संशोधन प्रबंधाचा कच्चा प्रगती अहवाल तयार करणे.
४)	डिसेंबर २०१२ ते मे २०१३	प्रबंध सादर करणे.

प्रकरण योजना–

१) प्रस्तावना

२) मराठा आरमार स्थापनेची पार्श्वभूमी

३) कान्होजी आंग्रे आणि आंग्रीया बॅक (चिकित्सा)

४) कान्होजी आंग्रे यांचे सागरी व्यवस्थापनविषयक धोरण आणि निर्णय

५) कान्होजी आंग्रे यांचे सागरी लष्करी व परकियांच्या बरोबरचे संघर्ष

६) कान्होजी आंग्रे यांचे सागरी युध्दतंत्र व गणिनी कावा निती

७) कान्होजी आंग्रे आणि सिद्दी यांच्या सागरी गनिमी तंत्राची तौलनिक चिकित्सा.

निष्कर्ष व सारांश –

संशोधकाने संशोधनाचे अनुमान येण्यासाठी हा आराखडा सादर केला आहे. साधनांची उपलब्धता आणि त्यातील माहिती यांच्या आधारे वरील रचनेत थोडाफार बदल होण्याचा संभव आहे. तरी देखील माझ्या संशोधनाचे उद्दिष्टे आणि गृहितके या संशोधनाच्या अक्षाभोवती हा प्रबंध फिरणार आहे.

संदर्भग्रंथ सूची –

अ) प्राथमिक साधने :

१) या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्तात येईल.

२) ऐतिहासिक कागदपत्रांची प्रत्यक्ष पाहणी

३) आंग्रेकालीन पत्रव्यवहार, संपादक – आवळसकर शांताराम व्ही.

४) आज्ञापत्र मानसन्मान प्रकाशन २००४, संपादक– डॉ. कुलकर्णी अ. रा.

५) सरखेल कान्होजी आंग्रे, डॉ. केतकर द. रा.,

६) मराठी राज्याचा उतराखंड–१, वासुदेवशास्त्री

७) साद सागराची, गोखले पु. गो.

८) मराठ्यांचे आरमार, मुंबई, पारसनीय द. ब.

९) पोर्तुगीज मराठा संबंध, पिसुर्लेकर पां. स.

१०) मराठ्यांच्या इतिहासाचे साधने, पोर्तुगीज दप्तर, देसाई स. शं.

११) हिंदुस्थानचा सागर विक्रम, डॉ. टेंभे भास्कर महादेव

१२) कुलाबकर आंग्रे सरखेल : आंग्रे घराण्याचा इतिहास, ढब्बू, दा. गो.

१३) डॉ. टेंबे भास्कर महादेव, हिंदुस्थानचा सागर विक्रम, यवतमाळ डिस्ट्रीक्ट असोसिएशन ग्रंथमाला पुष्प २१, १९३९.

१४) ढब्बू दा. गो., कुलाबकर आंग्रे सरखेल : आंग्रे घराण्याचा इतिहास, स्वीय प्रकाशन, १९३९.

१५) माळगावकर मनोहर, अनुवाद : पु. ल. देशपांडे, कान्होजी आंग्रे १९५०.

१६) आवळसकर शांताराम वि., (कोकणच्या इतिहासाची साधने) आंग्रेकालीन अष्टागार, (अधिकारी शकावली), स्वीय प्रकाशन १९४७.

१७) आवळसकर शांतारा वि., आग्रेकालीन पत्रव्यवहार

१८) डॉ. केतकर द. रा., सरखेल कान्होजी आंग्रे, 'मराठा आरमार' मृण्मयी ऋग्वेदी प्रकाशन, ३–१०–१९९७.

ब) दुय्यम साधने –

१) मराठाकालीन सामाजिक व राजकीय आणि सागरी पत्रव्यवहार

२) कोकणच्या इतिहासाची साधने (भा.इ.मं. त्रैमासिक १९४८)

३) ताराबाईकालीन कागदपत्रे, संपादक– डॉ. पवार आप्पासाहेब

४) शिवचरित्र साहित्य खंड ९, चौल अधिकारी दप्तर, संपादक- आवळसकर शांताराम व्ही.

५) मुंबई गॅझेट, पान क्र. १४, १६५

६) शाहूंची रोजनिशी

७) ऐतिहासिक बखरी, भाग १, संपादक- सोहनी अविनाश

८) कान्होजी आंग्रे १९५०, माळगावकर मनोहर, अनुवाद- पु. ल. देशपांडे

९) ऐतिहासिक संकीर्ण निबंध, त्रैमासिक, वर्ष ७-८ वे, इतिवृत्त शके - भारत इतिहास संशोधन मंडळ.

१०) सांगली, कोल्हापूर, पुणे येथील विविध महाविद्यालयातील ग्रंथालयांचा उपयोग करण्यात येईल.

क) इंग्रजी साधने -

1) Apale B. K., History of Marathas Navy & Marchantship, Sahitya Sankiriti, Mandal 1973.

2) Bombay Gazzetteer, Vol X Ratnagiri, 1980, Vo. XI Kulaba 1983

3) Bendre V. S., Downfall of Angre's Navy Mumbai Itihas Sanshodhak, Mandal cap. Sr.17.

4) Danvers F. C.- Prtuguese in Indias, London 1766.

5) Duif Grant, Hostory of Maratha's Vol. I, II, Ii

6) Edward Thompson, History of British Rule in India.

7) John Mill Low, Story of British India, History of Indian Navy Vol-1

8) Mahajan A. S., The influence of sea power upon history,

Boston

9) Malgonkar Manohar, Kanhoji Agnre, Maratha Admiral Asia Pub. House Bombay, London, New Yark 1959.

10) Moraes G. M., Kaddamba Kul, Bombay 1934.

11) Moraes G. M., Kanhoji Agnre's Relations and Portugese Journal of University, Bombay J. V. B. Mumbai, July 1947.

12) Mookarji R. K., Indian Shipping, London, 1937.

13) Mujumdar B. K. Military System of Ancient, India, Culcutta 1955.

14) Panikar K. M., Geographical Factors, Indian History, Bombay 1954.

15) Sen Surendranath N., The eary carieer of Kanhoji Angre & other papers, Culcutta, 1941.

16) Sen Surendranath N., Studies in Indian History.

17) Sen Surendranath N., Half Century of Maratha Navy Culcutta.

18) Sen Surendranath N., Military systeam of Maratha.

19) Srivastav B. K. Angre's of Koloba in British Record.

20) Sarkar Jadunath, History of Aurangieb Vo. IX, V.

– संशोधक –

गौतम ज्ञानदेव धुमाळ

एम. ए. (इति.) बी. एड्.

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय

औंध, ता. खटाव जि. सातारा.

– मार्गदर्शक –

प्रा. डॉ. अमर पांडे

इतिहास विभाग

श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय

सांगली.